# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/11/2023 (गुरूवार) दुपार


---

### अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन खापा** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा कन्हान नदीच्या पुलाजवळ खापा येथे फिर्यादी नामे– सुनिल पांढुरंग सोरमारे वय ३५ वर्ष रा गुमगाव ता सावनेर जि नागपुर यांनी पोस्टे ला येवुन रिपोर्ट दिली की दि २२/११/२३ रोजी सायंकाळी फिर्यादीचे भाउजी गोविंदा आनंदराव कारोकार हे फिर्यादीचे बहीणी सोबत कन्हान वरुन गुमगाव येथे भाउबिजेचे अक्षद लावण्याकरीता घरी आले होते. अक्षद लावणीचे कार्यक्रम झाल्यानंतर जावई यांना महत्वाचे खाजगी काम कोथुळना येथे असल्याने फिर्यादी व जावाई असे पल्सर मोसा क्र एम.एच ४० सी.आर. ५१७४ ने त्यांना बसवुन गुमगाव वरुन खापा मार्गे काथुळना कडे जात असता सायंकाळी ०७/३० वा दरम्यान कन्हान नदी पुल ओंलांडल्या नंतर अचानक एका आयसर कथ्या कलरच्या गाडीचे वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या वाहनाला मागुन धडक दिल्याने फिर्यादी व फिर्यादीचा भाउजी गोविंदा आनंदराव कारोकार रोड च्या साईडला पडुन जखमी झाले. फिर्यादीचे भाउजीला जास्त मार लागल्याने व रक्त निघत असल्याने सावनेर येथे उपचारा करीता नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे खापा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम २७९, ३३७, ३०४(अ) भादवी सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ ४६३ प्रमोद बनसोड पोस्टे खापा मो.न. ९९२३४१०२२३ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर